## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तीकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी ?

# प्रभुतरुण

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

www.prabhutarun.com

: संपादिका :

सुहासिनी कीर्तिकर

: कार्यकारी संपादकमंडळ :

मिनाक्षी जयकर
मयुरा नायक
संजना कोठारे
वैजयंती कीर्तिकर

किंमत १ रुपया

## प्रभु तरुण आश्रयदाते

१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे, कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर, कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

वर्ष ८५ वे) प्रभुतरुण मुंबई, शनिवार, ता. १६ माहे जानेवारी, सन २०१० (अंक ९६७


*संपादकीय*

## गोष्ट डॉट कॉम

-सुहासिनी कीर्तिकर

प्र. के अत्रे यांनी अतिशय सुलभ, सहज भाषेत लिहीलेलं पुस्तक आहे-; ‘कावळ्यांची शाळा.’ छोट्या छोट्या वाक्यांनी पुनरावृत्त होत येणाऱ्या छोट्या छोट्यांसाठीच्या गोष्टी. छाऽऽन संवाद. प्राण्यांची माणसांशी गट्टी. क्वचित् किंचित् उपदेशाचा धडा. पण एरवी नुसत्या नाट्यमय घटना. मुलांना आवडतात या गोष्टी. रमतात ती छान. माझ्या नातीला परवा मी त्यातलीच एक रंगवून सांगत होते. कथा साधारण अशी वाढली-...

‘एकदा एक म्हातारी अंगणात सांडगे वाळवत बसली होती,’ तेव्हढ्यात ‘‘आजी सांडगे म्हणजे काऽऽय?’’ तिचा प्रश्न. मग सांडगे म्हणजे ‘फ्रायम्’ आणि अंगण म्हणजे ‘आमची गच्ची’ अशी उत्तरे द्यावी लागली. मग गोष्ट पुढे चालू... तिथे एक कावळा आला. त्याने एक सांडगा घेतला. अन् तो उडून जाऊ लागला. म्हातारी म्हणाली, ‘‘ए, टाक सांडगा खाली. चोच धुऊन ये. मग देईन तुला सांडगा.’ ‘‘त्याने घेतलाच ना सांडगा? मग म्हातारी परत कशाला त्याला देणार सांडगा? चोच धुतल्यावर तोच सांडगा देणार का? मग ‘ब्रश’ करून काय फायदा? तो सांडगा ऑलरेडी खराब झालाच ना?’’- नातीचे एकच नव्हे; अनेक प्रश्नच प्रश्न! ‘आता गोष्ट ऐकायचीय ना? मग गप्प बस बरं’- असा माझा दम मिळाल्यावर गोष्ट पुढे चालू झाली. गोष्टीतला कावळा बिचारा आज्ञाधारक! गेला विहिरीकडे. ‘विहिरी विहिरी पाणी दे. पाणी घेऊन चोच धुईन. चोच धुऊन सांडगा खाईन कुडूमकुडूम.’ विहीर म्हणाली, ‘ पाणी देते; पण मडके आण जा.’ मग कावळा कुंभाराकडे जातो. तोच संवाद परत म्हणतो, ‘कुंभारा, कुंभारा मडके दे. मडके घेऊन पाणी आणीन. पाणी घेऊन चोच धुईन. चोच धुऊन खाईन सांडगा कुडूमकुडूम.’ असं करत करत कावळेबुवा कुंभाराकडून मातीकडे, मातीकडून लोहाराकडे उडत उडत जातात. लोहाराने कोयता दिला की माती उकरून मडके घडणार असते. मडके मिळाले की पाणी मिळणार... पाणी मिळाले की चोच धुणार आणि मग काय? खाईन सांडगा कुडूमकुडूम! केव्हढा प्रयत्नशील आणि धीर धरणारा आपला कावळा. ‘कुडूम-कुडूम’ आवाजाच्या लयीत संवाद वाढत असतो, वाक्य एकच स्वप्न गोंजारत असते. पण हाय!-लोहार कोयता देतो. नेणार कसा? कावळा म्हणतो, ‘ठेव माझ्या मानेवर’ मानेवर कोयता ठेऊन उडणाऱ्या कावळ्याची मान कापून जाते. संपली की गोष्ट!

पण इथे आमची गोष्ट संपत नाही बरं का. माझ्या नातीला हे अजिबातच आवडलं नाही. ‘हे काय? संपली गोष्ट? मग आता कावळ्याला सांडगा? त्याने ब्रश न करताच सांडगा खायला हवा होता का? कुडूमकुडूम कुडूमकुडूम? मला नाही आवडली ही गोष्ट. तो पॉटमध्ये पेबल्स टाकणारा हुशार कावळा कसा छान आहे. तिथून आणायचं ना या पण कावळ्याने पाणी. थर्स्टी नसला म्हणून काय? त्याला पटकन अंगणातच पाणी मिळालं असतं ना? आणि त्याने सांडगे खाल्ले असते कुडूमकुडूम’- तिनं मलाच त्यातून केव्हढी लांबलचक शक्यता असलेली गोष्ट सांगीतली.

लक्षात आलं माझ्या की गोष्टीचा

(पान २, कॉलम १ वर)

*विस्तारीत संपादकीय*

## BIG vs. BAD- lets begin the confusion...

- मयुरा नायक

"How big can you get before you get bad." – Subroto Bagchi.

The lines are written by him but have been told to me by a very senior person from the media fraternity. It happened on a day when our whole team sat for a refreshing coffee in the cafeteria after a day full of stress and pressure. It was a time when recession was just setting in our country and the grapevine suggested that our division was going to shut, the top management was going through a shuffle which led us to believe so. Many of our leaders were rumored to have been sacked, due to either incompetence or foul play in the organization; the market was packed with negative rumors about our company. Stalwarts in the industry claimed that the launch of this new division will mark the downfall of our company as a media house, thus in such an unsafe scenario, we were all very precarious about our existence in the company and our discussion in the cafeteria very explicitly revealed so. So engrossed we were in our conversation that we did not realize that our CEO had just walked in. Pretending to not have heard our conversation, he quickly reached for his fruit plate and walked out. Unfortunately for me, I was the longest working employee in the group that we were sitting in, as soon as we dispersed; our CEO spotted me from the glass door of one of our conference rooms and called me out. He said "Subroto has asked a very valid question in his book, "Go Kiss the World". He questions the readers "How big can you get before you get bad?" what he means to say is that there is an extremely thin line differentiating big from bad, and it is wise to take cognizance of this line, before the world starts terming you bad. So does it mean that every one who becomes big starts becoming bad?" I was a little blank for a few minutes. Firstly the CEO has caught me unaware and is now asking me questions which I assumed would require a witty answer to earn some brownie points. Well leaving me in that confused frame of mind he quickly retaliated to his own question. He said "Well I differ a little on this; I feel that if you have at least a dozen people considering you BAD, you are on your path to becoming BIG. These losers can't see us grow that is the reason you hear them floating such rumors about us!" He continued by saying "The threat of seeing someone grow compels certain people to pull you down. 10 people will criticize you not because they strongly feel so, but because they see a potential threat in you to their career. The news floating in the market just proves it that we are posing a threat to the other players and the only alternative they are left with is talking ill of our company and people. So while people term us as BAD, we must all celebrate the fact that we are on our road to success and will soon become the BIG Daddy in the industry."

WOW this man actually set me thinking. In spite of the fact that his comparison and relevance of what Bagchi comments in his book to his idea of BIG vs. BAD is debatable, he still made two strong statements, he placed two views both sounding correct

(cont...on. page 2, col, 3)

Vijay Printing Press Qt. 75000/ 2010

(पान१, कॉलम१वरून)

असा दुर्दैवी शेवट तिला अजिबातच आवडली नाही. बरोबरच आहे. कावळा असो वा इतर कोणताही पक्षीप्राणी. मन संस्कारी आणि निरोगी असलं की कोणीही उगाच असं बिच्चारं होणं रुचत नाही. मला वाटतं; आपण मोठ्या माणसांनीही असंच संस्कारी आणि निरोगी मनानंच कल्पना केल्या पाहिजेत. बालगोष्टी लिहा अगर न लिहा. बालगोष्टी करता करता बाळांच्या कल्पनेतल्या खऱ्याखुऱ्या गोष्टी ऐकल्या पाहिजेत. वास्तवातही तशाच आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. थोडक्यात म्हणजे; नकारात्मक शेवटाकडे न जाता सकारात्मक शेवटाकडे जाणाऱ्या कल्पनांचे; घटना संकल्पनांचे सेतू उभारले पाहिजेत. सध्या नकारात्मक घटना अवतीभवती खूपच आहेत. महागाई आहे, चढत्या श्रेणीतला स्वार्थ आणि भ्रष्टाचार आहे, आत्महत्यांना प्रवृत्त करणारे अपेक्षांचे ओझे विद्यार्थ्यांवर आहे, पाणी प्रश्न आहेत, 'वीज' कडाडते आहे, हवा प्रदुषित होते आहे, 'आकाशाचा मुका घेणाऱ्या' इमारतींनी पायाखालची जमीन काबीज करत तिला 'धरणीठाय' केलं आहे. म्हणजे आप, तेज, वायु, आकाश, पृथ्वी ही पंचतत्त्वेच आज मानवी जीवनात भेडसावणारे रूप धारण करत 'मानेवर कोयता' ठेवून जगायला लावता आहेत. माणसातील माणुसकी जीवंत ठेवायची असेल तर नकारात्मक गोष्टींचा सकारात्मक शेवट कसा होईल याचा विचार आपण आपले सगळे नको ते, नसलेले 'मोठेपण' बाजुला ठेवून करायला हवा आहे. निरोगी आणि संस्कारी मन घेऊन. अपार माणुसकीची माया घेऊन. सकारात्मक बुद्धी घेऊन.

मला वाटतं, दोन हजार दहा सालानं उजाडलेल्या या नव दशकात हे असं झालं; तरच आपल्याला आपल्या बुद्धिभ्रष्टतेचे, कृतिभ्रष्टतेचे डाग पुसता येतील. खऱ्या अर्थानं नवजीवन लाभेल. केवळ तंत्र नको. मंत्र हवा. गती केवळ नको. शांतीमय मती हवी. केवळ दिखाऊ समृद्धी नको, खरीखुरी वृद्धी हवी. केवळ मोहमयता नको. निरामयता हवी.

माझ्या नातीने शिकवलेल्या सकारात्मक शेवटातून मला जे उमगले ते केव्हढे मोलाचे आहे! मुलं हीच गुरू! या गुरूला प्रमाण मानत नव्या वर्षाचे शुभ चिंतीते.

नवीन वर्ष वैचारीक आबादीचे जावो. संस्कृती जोपासनेचे जावो. त्यासाठी आपल्या सर्वांना आयु, आरोग्य, शांती, जोम लाभो. 'परस्परा जीवांचे मैत्र' जडो. समस्त ज्ञातीयांची; आणि अर्थातच 'प्रभुतरुण' परिवाराची भरभराट होवो. 'प्रभुतरुण'ची वेबसाइट, 'प्रभुतरुण'चा युवामंच, संपादकमंडळ यांच्या सकारात्मक यशस्वी वाटचालीला आपल्या सर्वांचा आशीर्वाद मिळो. सर्व ज्ञातीसंस्थांना आणि आपल्या सर्वांसर्वांना नवे दशक शकुनाचे जावो.

गोष्टीतल्या कावळ्याच्या मिषाने वैचारीक जाण आणि अंतरीचा भाव यांनी 'शकुन गे माये सांगताहे' अशी अवस्था केलीय. अशी 'अवस्था लावोनी' जाणारी समृद्धी सर्वांना लाभो.

२०१० साल मंगलमय होवो.

## Pathare Prabhu Charities

## *IMPORTANT CIRCULAR*

The Members of the Pathare Prabhu Community are hereby informed that the following premises in possession of the Trust are being allotted on Leave and License basis for Residential Accommodation, to the needy and deserving community members, on the following terms and conditions.

**1. The Monthly Compensation**

| **Particulars of the Premises** | **Amt. (Rs.)** |
|---|---|
| i) Tenement No. 4 - Gulab Smruti (Andheri) Ground Floor, with Attached bath and toilet | 4,000.00 |
| ii) Tenement No. A-1, Mukund Ashram (Andheri) Ground Floor, with Attached bath and toilet | 3,500.00 |
| iii) Tenement No. 14, P.P.D. No.5, (Mahim) Second Floor with common bath & toilet | 2,000.00 |
| iv) Tenement No. 3, P.P.D. No.5 - Annexe (Mahim) First Floor with common bath and toilet | 2,500.00 |

**2. Stamp Duty and Registration Charges.**
The stamp duty and registration charges shall be borne by the respective License.

**3. Security Deposit.**
Each Licensee Shall be required to pay a sum of Rs. 3.0 lacs (Rupees Three Lacs only) as interest free refundable Security Deposit, simultaneously with the execution of Leave & License Agreement.

**4. Term of Lincense**
The maximum period for the License shall be not more than 60 months.

5. Particulars of Accommodation
Each premises consists of one room and kitchen having approx. built up area of 300 sq.ft.

The application Forms shall be available to the interested members of the community in the office of the Trust at Thakurdwar from Mondy, January 11, 2010, during all working days between 11.30 a.m. and 5.00. p.m.

Mumbai
Dated - November 29, 2009

for the Board of Trustees
of the Pathare Prabhu charities
Ajit M. Vijaykar
Chairmen-Trustee

(cont...from. page 1, col, 4)

independently but contradicting each other. In my opinion, these two statements could have never been compared. Although I haven't read his book, I feel what Bagchi is asking his readers to do is introspection of what moral benchmarks we hold in our lives and are we able to sustain them even when we become successful. While what our CEO opines is that once we are big the external environment wants to claim us as bad as we pose a threat to their growth. I think both experiences find place in our lives at different levels. While introspection is a constant process, dealing with such negativity often or occasionally is also as common.

How Big can we get before we get bad! The best example to site here would be of our very own politicians. They just cannot handle success; in fact what makes them bad is GREED. Greed for power, money, fame, name, everything! They turn evil because of selfish interests. How many of them fulfill promises they make while campaigning for elections, once they are elected? How many of them are sincerely working for this country? Most of them raise an issue and sit back enjoying the ordeal that the common man then has to deal with. A list of genuine politicians is so small that it can probably be counted on our finger tips I'm sure. Well another industry which is filled with such people is our very own BOLLYWOOD. We often read news on certain actors, about their arrogance, and humiliating behavior towards fellow artists or junior actors. There are many film stars who have not been able to handle success. Success gets to their head and arrogance takes over. All news might not be authentic, but as they say there is no smoke without fire! I'm sure we do have such specimens existing, but that hardly affects us in any way. In fact it is quick entertainment for us when we so interestingly read about them in magazines and newspapers. Mr. Madhur Bhandarkar in fact made a whole movie called "FASHION" which showed this same journey of a model that rises to fame and then experiences a downfall due to the negative impact, fame has on her. Madhur Bhandarkar is known for his real cinema, so if this is reality, then our entertainment industry is filled with such people who can very well justify Bagchi's statement.

But at the same time we cannot ignore some people who have become BIG but still have their modesty and goodness intact. I'm sure they all have sacrificed a lot in their lives to achieve this image. They are people who want to become big but not at the cost of someone else. They are people who are determined to make a difference to the society and touch lives as they pass their journey. I'm sure there are some renowned names which fall in this category of people too. I have myself experienced many people who have touched my life and to me are selfless people, who are far BIG in my opinion, but because they are selfless, they could never make a big name for themselves? Is it their good nature that stood as a hurdle? Or were they plainly incapable. If being good is a hurdle then what makes Dr. Narayan Murthy as big as he is? He is just one off names that comes to my mind, but what happens to those benevolent leaders who disappear in the crowd? They are the unsung heroes in our lives who have never got their due credit. But is it their fault?

Well introspection is definitely the answer! While we steadily climb the ladder to success and prosperity, if we give up introspecting our actions and reactions, we might lose the plot! Having our heads firmly held on our shoulders is so critical! As we grow the eye balls doing a quick scrutiny on us, also steadily grow. At such a point, what is most difficult is to remain good in front of all these eyes! While that is tough, what is important is to remain good in our own eyes! Well all this is easier said than done! Many a times I have fought with my own conscious for some of my actions! While we may not act in a way that is harmful to others, but we often react to other's harmful actions in a way that make us look bad to the world! My personal experience says that if we think with our hearts, we sometimes tend to repent on our decisions at some point in the future, but if we think with our heads, we often make the right decision! Many of my friends argue with me that with matters related to the heart, you should always think with your heart! I feel that even in matters related to the heart if we think with our hearts we often flow with emotions and lose our ability to rationally think from all perspectives, in the bargain ruining either our side of the story or someone else's. If a practical mind has to take a decision, with good intentions, the decision will always be rational and fruitful. Of course here the good intentions bear maximum weight as without such good intentions, the results will never be fruitful!

But however good our intentions are, we still face flak for our actions and reactions. Every success story has some criticism attached to it. In fact, we are so accustomed to these criticisms that we cannot enjoy our success without tasting some of it.

Meaningful criticism helps us mend certain pitfalls, we can avoid in future. And the insignificant disapprovals to our actions are only meant for sharing and laughing it out! Here I quite agree with what my CEO said that such insignificant criticism is meant to be enjoyed as they are proof of our

(cont...on. page 3, col, 1)

# किस्से कोर्टातले

-सौ. बागेश्री योगेन परीख

*(सौ. बागेश्री योगेन परीख (पूर्वाश्रमीच्या कु. बागेश्री सदाशिव धुरंधर) या कुटुंब न्यायालयाच्या एक तप न्यायाधीश होत्या. वैवाहिक समस्याग्रस्त महिलांचे समुपदेश करणाऱ्यात त्या संस्थापक महिला आहेत. संस्थापक म्हणून कुटुंब न्यायालयात त्यांचा फोटोही विराजमान आहे. त्यांच्या समुपदेशनाचा लाभ त्या आजही 'बापनुं घर' सारख्या संस्थेतून आणि इतरत्र देत असतात. न्यायाधीश म्हणून निवृत्त झाल्यावर त्यांच्या अनुभवाचा लाभ आपल्या वाचकांना व्हावा; या उद्देशाने हे सदर या वर्षी सुरू करीत आहोत. यावर वाचकांच्या प्रतिक्रिया अपेक्षित आहेत.- संपादक)*

१९८० साली मुंबईच्या सिटी सिव्हिल कोर्टामध्ये मी मॅरेज काऊन्सीलिंगची सुरुवात केली. त्यावेळी जे न्यायाधीश विवाहविषयक खटले चालवीत असत, त्यांना नेहमी असं वाटायचं की, काही काही केसेस अगदी क्षुल्लक कारणासाठी कोर्टात फाईल केल्या जातात आणि त्यांना जर योग्य समुपदेशन देण्यात आलं तर आपण त्यांचं वैवाहिक जीवन वाचवू शकू. ह्या कारणाने त्यावेळचे न्यायाधीश एच्. सुरेश (न्यायमूर्ती) ह्यांनी टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेसला असं प्रयोगात्मक काम करण्याची विनंती केली आणि माझ्या कामाची सुरुवात झाली.

१९८० ते १९९५ पर्यंत मी मॅरेज काऊन्सीलिंग केलं. बरीच लग्नं वाचवली, बऱ्याच जणांना समुपदेशनाच्या सहाय्याने समस्येला तोंड द्यायला मदत केली. त्यानंतर १९९५ते२००७ अशी१२ वर्षे (एक तप) मुंबईच्या कुटुंब न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम पाहिलं. आता मात्र एक त्रयस्थ म्हणून ह्या केसेसकडे पाहू शकते. मॅरेज काऊन्सीलिंग व न्यायदान ह्यामुळे बराच अनुभव गाठी आहे. सुहासिनी कीर्तिकर ह्यांच्या विनंतीनुसार हा अनुभव शब्दांकित केला जावा व ह्याचा उपयोग सुजाण वाचकांना व्हावा ह्या उद्देशाने काही केसेस लिहिण्याचा प्रयत्न करणार आहे. वाचकांचा सहभागही अपेक्षित आहे.

कुटुंब न्यायालयात येणाऱ्या केसेस संवेदनाशील असतात. बऱ्याच समस्या, कायद्याच्या काटेकोर चौकटी बाजूला ठेऊन, भावनिक आधार घेऊन सोडवाव्या लागतात. ह्या केसेस लिहिताना कायद्याच्या खोलात न जाता, मथितार्थ, एकमेकांच्या भावनांची होणारी घालमेल व त्यांचा पुढचा प्रवास ह्यावर भर दिलेला आहे. कुटुंब न्यायालयात येणारे बरेचसे खटले लग्नानंतरच्या दोन ते तीन वर्षात केलेले आढळतात.

कुटुंब न्यायालयात प्रामुख्याने घटस्फोट, विवाह रद्दबादल ठरवणं, विवाह हक्क प्रतीस्थापन, पोटगी, मुलांचा ताबा, मनाई हुकूम, अशा तऱ्हेचे खटले येतात.

हिंदु विवाह कायद्याच्या कलम १३ खाली घटस्फोट मागण्यासाठी लग्नाला निदान एक वर्ष होणं आवश्यक आहे. हिंदू धर्मात लग्न हा एक संस्कार समजला जातो. लग्न केल्याकेल्याच एका फटक्यात ते चुटकीसरशी मोडावं एव्हढं क्षणभंगुरत्व लग्नजीवनामध्ये अपेक्षित नसल्यामुळे विधीज्ञांनीसुद्धा लग्न झाल्यापासून घटस्फोटाची याचिका करण्यासाठी एक वर्षाचा काळ दिलेला आहे. तसं पाहिलं तर मन जुळायला किंवा एकमेकांना समजून घ्यायला हा वेळ अपुराच आहे. पण कधी कधी असं होतं की, दोघांचे स्वभावच इतके विचित्र असतात की, त्यांच्यात पटवून घेण्याची क्षमता नसते, आणि मग त्यांना घटस्फोट घेणं भाग पडतं.

मी न्यायाधीश असतानाची केस आहे. प्रकाशने आपली पत्नी जया हिच्याविरुद्ध क्रूरतेच्या कारणावरून घटस्फोटाचा दावा केला होता. केसची पार्श्वभूमी साधारण अशी होती की, दोघेही मध्यमवर्गीय, महाराष्ट्रीयन होते. ॲरेंज मॅरेज होतं. प्रकाश बँकेत कारकून होता, तर जया बरीच वर्ष बीएमसीमध्ये कामाला होती. दोघांची वयं ३५-४० ची असावीत. लग्न ठरल्या ठरल्याच दोघांनीही स्वतंत्र संसार करायचं ठरवलं. दोघांनी सारखेच पैसे गुंतवणूक करून बोरीवलीला एक छोटासा ब्लॉक घेतला व संसाराला सुरुवात केली. जया काहीशी आळशी व स्वच्छतेचा अभाव असणारी तर प्रकाश स्वच्छतेचा भोक्ता. टापटीपीची आवड असणारा होता.

जया जेवल्यानंतर रात्री खरकटंसुद्धा साफ करत नसे. खूपदा सांगूनसुद्धा तिनं कानाडोळा करण्याचं निमित्त होऊन दोघांची चांगलीच जुंपायची. एकदा तर प्रकाशचा राग अनावर होऊन त्यानं तिला एक लगावून दिली. जयाला हा धक्का अनपेक्षित तर होताच; पण तिच्या इगोला प्रचंड ठेच लागली होती. अद्वातद्वा बोलण्याचापण प्रकाशवर काहीही परिणाम होत नाही हे पाहिल्यावर तिने मूकपणे त्याला त्रास देण्याचा चंग बांधला व अबोला धरला.

दुसऱ्या दिवसापासून प्रकाशच्या जेवणात मीठ, मिरची जास्त पडू लागली. इतकी की त्याला एक घास घेणंसुद्धा दुरापास्त होऊ लागलं. स्वत:च्या बायकोचा डाव न ओळखण्याएव्हढा प्रकाश दूधखुळा नव्हता. त्यानेही सतवायला सुरुवात केली, 'मी उद्यापासून घरी जेवणार नाही.' असंच त्याने घोषीत केलं, आणि मग सकाळी उठून कुकरची शिट्टी लपविणं, असे उद्योग सुरु केले, जेणेकरून जयाला ऑफिसला जायला उशीर व्हावा.गॅसवाला आल्यास त्याला परत पाठवणं, भरून ठेवलेल्या पाण्याची बादली ओतून टाकणं अशा त्याच्या वागण्याने जया जेरीस आली. दोघांत प्रेमाचा ओलावा राहिलाच नाही आणि एकमेकांना त्रास देण्याची चढाओढ लागली. पण घर सोडण्याची किंवा विभक्त होण्याची दोघांचीही तयारी नव्हती.अखेर कंटाळून प्रकाशने घटस्फोटाचा दावा केला.

पतीपत्नी एकत्र राहत असल्याने काऊसिंलीग करून भांडण मिटवून सलोखा घडवून आणण्याचे कोर्टाचे प्रयत्न चालूच होते. पण सकारात्मक

(पान ५ वर)

## हसरी रेखा

-प्रदीप कोठारे




(cont...from. page 2, col, 4)

success! Even the best people, institutions, and companies are condemned for some of their actions. Some of the best work is criticized for what it is! Another example from our very own Bollywood; The most critically acclaimed film "BLACK" was also criticized by Aamir Khan for its portrayal of the physically challenged and the way Amitabh Bachchan's character handles his patient. All this again to garner publicity for his own film "TAARE ZAMEEN PAR" which was soon to be released then! Sorry folks, the movie buff that I am, I can't find more appropriate examples to establish my point of view as movies are something we all can relate to.

Now that I have already written more than two pages talking about the journey from The BIG to The Bad, I still need to figure why in the first place did I ever choose such a topic? A topic which elaborated two thoughts, both thoughts which were not mine! Both compared without much relevance by someone but not me. Still I managed to write more than two pages talking of both points of view! May be both thoughts reflected me in some degrees? May be? Well if I am still battling between growing big and turning bad, or if I am already rejoicing being proclaimed as bad because I am growing big, what has happened to the good in me?? Well as I continue to introspect, the lesson that I have already learnt is that "Never openly discuss your point of view in a public place such as the CAFETERIA, lest you never know which wrong person has his ears on you!" Well thanks to my team, had we not discussed our woes in the cafeteria, our CEO would have never heard us, and it would not have sparked off that conversation between us, which further flickered into this discussion. Whatever the lesson may be, or whatever confusion I have managed to create in your minds it has surely given me something to write as my editorial!

❑

YUVA MANCH
Together Towards Tomorrow

## Mind Your Identity: Online identity theft

- Varada Kothare

Online identity thefts have become a major concern all over the net world. Identity thefts are considered as crimes and people resorting to identity thefts are considered criminals. It is important to know what it means and the measures that are being taken to prevent that.

Online identity theft is the practice of pretending to be someone else on the internet. The purpose can be quite harmless (like chatting with someone under someone else's account), but when referred to in the media, it's often about the criminal activity of stealing someone's personal information for his or her own financial gain.

**Techniques for obtaining information**

❋ stealing mail or rummaging through rubbish (dumpster diving)
❋ listening in on public transactions for getting hold of personal data (shoulder surfing)
❋ acquiring personal information in computer databases without authorit [Trojan horses, hacking]
❋ penetrating organizations that store large amounts of personal information
❋ impersonating a trusted organization in an electronic communication (phishing)
❋ Spam (electronic) Some mails ask you to enter your personal information on winning something etc. this information is then used for online impersonation.

**Dumpster Diving:** Dumpster Diving has become very popular, and is considered a great resource by many people.

The practice of going through any kind of commercial or residential trash to find items thrown away which might be used by the person going through the trash is known as dumpster diving. This discarded material maybe utilized as and when required by the diver since the owner has already relinquished the ownership.

**Social Engineering:** Social Engineering is the use of influence and persuasion to deceive people for the purpose of obtaining information or persuading the victim to perform some action.

Social engineering basically means acquiring key sensitive information or unauthorized access through building inappropriate trust relationships with someone with whom all this information is available. What these people do is trick someone into providing the information. They succeed because of basic human tendencies like being helpful, trusting people etc.

**Scenario**

Mary has cracked Janie's password!!!!

All she did was social engineering on Janie. That day in the afternoon Mary came to know that Janie, her colleague had stored some important client files in her mailbox.

Mary and Janie knew each other well. Mary asked Janie out to a restaurant that evening for an informal chat session. At the restaurant Mary asked some personal questions that could help her in cracking Janie's password. During the due course of their conversation, Janie revealed her secret answer for her password to Mary.

Just think what Janie will face after Mary cracks into her mailbox…..to make matters worse she may even have identity crisis.

**Trojan: A Trojan** is a small program that runs hidden on an infected computer.

With the help of a Trojan an attacker gets access to stored passwords in the trojaned computer and would be able to read personal documents, delete files, display pictures, and/or show messages on the screen

**Scenario**

It is Valentines Day, but Jack is totally shattered from inside. Reason: Jill just rejected his proposal. He wants to teach Jill a lesson.

One day Jack sends an e-mail with an attachment, which looked like a word document, to Jill. Unsuspectingly Jill clicks the attachment and found that there was nothing in it.

Bingo! Jill's system is infected by a remote access trojan, but she is unaware of it. Jack has total control over Jill's system.

Guess what Jack can do to Jill?

❋ Steal her passwords.
❋ Delete all of her confidential files.
❋ And much more

**What is it that the Trojan creators look for?**

❋ Credit card information, e-mail addresses.
❋ Accounting data (passwords, user names, etc.)
❋ Confidential documents
❋ Financial data (bank account numbers, Social Security numbers, insurance information, etc.)
❋ Calendar information concerning victim's whereabouts

**Indication of a Trojan Attack:**

❋ Documents or messages print from the printer by themselves.
❋ Computer browser goes to a strange or unknown web page by itself.
❋ Windows color, screen saver, wall paper or background settings change by themselves.
❋ Right and left mouse buttons reverse their functions
❋ The ISP complains to the victim that their computer is IP scanning.
❋ The account passwords are changed or unauthorized persons can access legitimate accounts.
❋ Strange purchase statements in credit card bills.
❋ The computer monitor turns itself off and on.
❋ Modem dials, and connects, to the Internet by itself.
❋ Ctrl + Alt + Del stops working.

While rebooting the computer a message flashes that there are other users still connected.

**How to avoid a Trojan infection?**

❋ Do not download blindly from people, or sites, if it is not 100% safe.
❋ Do not use features in programs that automatically get, or preview, files.
❋ Run local versions of antivirus, firewall, and intrusion detection software at the desktop.
❋ Rigorously control user permissions within the desktop environment to prevent the installation of malicious applications.

**Future:**

Laws have to be updated to include all possible aspects of hacking and online identity thieves should be severely punished. Along with the criminal, the sites which are encouraging online thefts should be permanently banned and the owners of the site should be blacklisted.

Companies should also focus on educating employees and make them aware of the threats. Security software should be installed for better handling of security. Along with this, regular security audits should be done.

Employees should be warned against discussing project plans in local places. Companies should use hardware devices to shred. Government should focus on bettering the cyber-forensics team, which will help tackle and track the online criminals.

Change in the attitude and the importance of punishing such crimes should be highlighted and accordingly measures should be taken. This will bring about necessary changes that are required for our country to prosper on technology grounds.

## निवडणुकीची रणधुमाळी-महाराष्ट्र विधानसभा २००९

-चारुदत्त धैर्यवान

काँग्रेसच्या पंजाने केली राष्ट्रवादीच्या घड्याळ्याबरोबर मैत्री
लागले गुंफू गोफ आघाडीचा!
भाजपच्या तळ्यातील कमळावर सेनेच्या वाघाने मळ्यातून बाण सोडले
युतीचा खेळ तळ्यात मळ्यात खेळू लागले!
उरल्या सुरल्या पक्षांनी रिडालोस नावे घेर धरला
तिसऱ्या आघाडीचा झिम्मा रंगला!
मनसेच्या मराठी आगीन गाडीवर राजने एका हाताने फिरकी धरली
चटेरी पटेरी पतंग आकाशी उडू लागली!
जनता मतदार महागाईने बेजार
मत देण्यासाठी कशी होईल तयार!
आघाडीला मत दिले तरी काय ते देणार
युतीला जिंकून आणले तरी काय नाय मिळणार!
तिसरी आघाडी नको रे बाप्पा
मनसे म्हणजे कुकूले बाळ!
लोकशाहीची ही कात्री
झोपवेल उपाशी सर्व रात्री!
नाही येणार धावून कुठलाच मंत्री
मतदाराला आहे खात्री!

(रचिल्या ऋषी मुनिनी
ह्या चार ओळ्या चारुच्या मुखातून)

**शिदोरी**

# काढावी लागते पळवाट

**-उज्ज्वला गोविंदराव भगवंतराव आगासकर**

*(वास्तुतज्ञ उज्ज्वला आगासकर यांनी त्यांचे काम आणि समाजकार्य;- या निमित्ताने भरपूर प्रवास केला. त्यावेळी त्यांनी जमा केलेली 'शिदोरी' या अंकापासून वाचकांसाठी देत आहोत.- संपादक)*

पूर्वीच्या पिढीमधल्या एका विनोदी लेखकाचा आवडता नायक जेव्हा इतरांशी वाद घालायचा, तेव्हा त्याच्या संतापाची हद्द झाली की समोरच्याला म्हणायचा, ''बास् झाले तुझे मुद्दे. आता तुझ्या मुद्द्यांचा कुटून लाडू कर आणि गाढवाला खायला घाल!'' लहानपणी मी जेव्हा हा मजकूर वाचायची तेव्हा त्यातून निघणाऱ्या अर्थापेक्षा माझ्या नजरेसमोर ते चित्र उभे राहत असे आणि त्याची फार गंमत वाटायची. नंतर मोठेपणी मात्र या कल्पनेचा मला थोडा उपयोग होऊ लागला.तो कसा? तर समोरचा माणूस मूर्खपणाने बोलतो आहे असे लक्षात आल्यावर आपण चिडून त्रास करून घेण्यापेक्षा मी स्वत:शीच म्हणते, 'कुटून लाडू-'' म्हणजे एका मिनिटात राग पळून जातो!

कामाच्या संदर्भात किंवा एरव्ही सहज म्हणून फिरताना बऱ्याच वेळा असे प्रसंग येतात की त्यावर प्रतिक्रिया द्यावी लागते आणि ती देताना विचार करायला मुद्दे कुटायला वेळदेखील नसतो. तेव्हा अशी एखादी पळवाट काढणे सोयीचे ठरते असा माझा अनुभव आहे. इतरांच्या दृष्टीने अशा पळवाटा काढणे हे योग्य की अयोग्य, असे करणे शोभते का, वगैरे वगैरे चालू देत-त्यांनी खुशाल करावे 'कुटून लाडू'- आपल्याला प्रॉब्लेम संपवण्यात इंटरेस्ट असतो!

बऱ्याच वर्षांपूर्वी आई-वडिलांबरोबर मी दक्षिण भारताचा प्रवास केला. तेव्हा निघताना सामानामध्ये कॅमेरा घेतला. तसेच स्केचबुक व काळी स्केच पेन्सदेखील घेतली. खरे म्हटले तर धावतपळत सर्व स्थळांना भेटी देणे व तेव्हा पटापट टिपलेले फोटो घरी परतल्यावर सावकाश पाहणे अशा कार्यक्रमामध्ये या स्केचबुकचा कसा काय उपयोग होणार होता? निघताना सामान मोजके व किमान ठेवण्याऐवजी उगीचच वाढवून ठेवले असे वाटले.

कॅमेऱ्यात किती टिपायचे ते टिपा, कुणी तुम्हाला अडवणार नाही. मात्र तेथील देखण्या मंदिरांच्या प्रशस्त आवारात तुम्ही दर्शनासाठी प्रवेश केला रे केला की फोटो काढायला बंदी! ते लोक नुसतेच सांगून थांबत नाहीत, तर सगळीकडे पाट्या लावून ठेवलेल्या असतात. तरीही कुणी ऐकत नाही असे वाटले तर सरळ हातातून कॅमेरा काढून घेऊन ऑफिसात जमा करून ठेवायचे आणि परत जाताना द्यायचे. चुटपुटण्या-शिवाय किंवा हळहळण्याशिवाय तुम्ही काय करू शकणार?

अशा वेळी माझ्या स्केचबुकने त्यांच्या या नियमातून मला फार छान पळवाट शोधून दिली! चित्रकला हा विषय आवडीचा असल्यामुळे मी फार पटकन् चित्र काढू शकते. त्यातून शिल्पशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे असे जे तेथील कोरीवकाम होते त्या साऱ्याची मी पटापट चित्रे काढीत असे. बाकीचा सारा ग्रूप गाईड, देत असलेली माहिती ऐकत फिरत असला तरी मी त्यांच्याबरोबर जात नसे. मी मला पाहिजे ती चित्रेच काढीत असे. त्या ग्रूपमधल्या इतरांच्या लक्षात जेव्हा त्या चित्रांचे महत्त्व आले तेव्हा त्यांनी चित्रांच्या झेरॉक्स कॉपीज् करून नेल्या.

दुसरी एक गंमत यातूनच निर्माण झाली. फोटो काढू पाहणाऱ्यांना जसे सगळे पळत येऊन 'नाही, नाही' करायचे. तसे आपल्यालाही करतील की काय, अशी मला भीती होती. मात्र सगळ्या ग्रूपबरोबर न जाता ही एकटीच चित्रे काढीत फिरते हे पाहिल्यावर मंदिरातले पुजारी एकमेकांशी चर्चा करू लागले, ''ये कौन है? ये बंबईकी आर्टिस्ट लडकी है। इसको हेल्प करो।' म्हणजे साफ उलटे चित्र निर्माण झाले! आणि माझ्या हे लक्षात आल्यावर मी यथेच्छ भाव खाऊन घेतला. त्यातून निर्माण झालेली एक गंमत पुढच्या वेळी सांगावी म्हणते.

❑

## Panoramic View Of The Mindset Of Gen-next Pathare Prabhu

**-Milind Kothare**

It turned out to be a very absorbing Sunday yesterday. It all started with India winning the Mumbai Test & then conquering no. 1 position much quicker than expected. Then it was a 'happening' afternoon birthday party & then shopping binge with the family.

But the cream of Sunday evening was Prize Distribution to the young & successful achievers in academics.

The real excitement in the whole long ceremony was the two minutes speeches delivered by the young achievers. We must really thank Pathare Prabhu Charities for giving our gen-next, the freedom to express themselves.

It started with young Harsh Desai (incidentally he is my neighbor & I have learned a thing or two about football from him, what cricket was to us football & F1 is for the Gen Next) beaming with confidence & making a bold statement like this is just a beginning. It was remarkable that quite a few of them had taken a lot of effort to deliver their thanks in quality Marathi & the special effort behind their speech was visible. Although only one achiever mentioned about giving returns to the community, I am sure a lot of them had this sense of gratitude in their minds. It was also very heartening to see young Rooshabh Jayakar mentioning the name of his mentor Dr Ranjan Desai who was present in the audiences. The most honest & practical speech was delivered by Paraj Dhurandhar. I liked the way he said, "***boss ye khatam karna hai***". Jatin Kothare bought good humor to break the monotony; he also stood out because he expressed his desire to be an entrepreneur.

All these exciting speeches & the grandeur of event was topped with grand dinner with a good spread of cuisines. I was hungry & the best bet at a Pathare Prabhu event to get a quick bite was hitting a vegetarian counter which was very tasty.

My appeal to all young achievers would be to stay connected through networking with each other & share domain knowledge that will help all of us to grow in respective professional fields. This will be indeed a good return to the community in contemporary terms which elated all of you on such glorified platform.

So overall it turned out to be a very eventful Sunday which will be stored in my archives & retrieved as nostalgia.

## पाठारे प्रभु सोशल समाज

पाठारे प्रभु सोशल समाजातर्फे रविवार दि. ८ नोव्हेंबर,०९ रोजी पुढील स्पर्धा घेण्यात आल्या.

**रांगोळी स्पर्धा (वेळ १ तास)**
**विषय-ठिपक्यांचा गालीचा**

१५ वर्षाखालील
प्र.क्र.-कु. शौनक कौशिक जयकर
द्वि.क्र.- कु.युग परेश कोठारे

१५ वर्षावरील (वेळ १ तास)
प्र.क्र.-कु. श्वेता शिरीष कोठारे
द्वि.क्र.-सौ. अक्षदा अजित तळपदे
तृ.क्र.-श्रीमती सुरूपा राणे/देवरुखकर

**चित्रकला स्पर्धा (वेळ ३० मिनीटे)**
**विषय-दिवाळीचा देखावा**

१५ वर्षाखालील
प्र.क्र.-कु. शौनक कौशिक जयकर
द्वि.क्र.-कु. नील सतेज राणे
विभागून-कु. यश शैलेंद्र तळपदे
तृ.क्र.- कु. युग परेश कोठारे

१५ वर्षावरील
प्र. क्र.-श्रीमती सुरूपा राणे/देवरुखकर
द्वि.क्र.-सौ. पल्लवी परेश कोठारे
तृ.क्र.-सौ. स्वप्ना विनित जयकर

**हस्तकला स्पर्धा-वेळ ३० मिनीटे**
**विषय-कागदी कंदील**

१५ वर्षाखालील
प्र.क्र.-कु. युग परेश कोठारे
द्वि.क्र.-कु. शौनक कौशिक जयकर
तृ.क्र-कु. यश शैलेंद्र तळपदे

**विषय-कागदाची लॅम्पशेड**

१५ वर्षावरील
प्र. क्र.-श्रीमती सुरूपा राणे/देवरुखकर
द्वि.क्र.-सौ. स्वप्ना विनित जयकर
तृ.क्र.-सौ. पल्लवी परेश कोठारे

वरील स्पर्धांचे परीक्षण अनुक्रमे सौ. शिल्पा गौतम वेलकर व सौ. प्रतिमा अजित वैद्य या भगिनींनी केले.

......

समाजाची रविवार दि. २७ डिसेंबर २००९ रोजी एक दिवसीय सहल मुरबाड येथे गेली होती.

.......

पाठारे प्रभु सोशल समाजाचा ९५ वा वार्षिक बक्षिस समारंभ रविवार दि. २१ फेब्रुवारी २०१० रोजी साजरा होईल.

❑

(पान ३ वरून)

संबंध प्रस्थापित होत नव्हते.

दोघंही दिवस ढकलत होते. एक दिवस प्रकाश त्याची ६ ते ७ शर्ट घेऊन कोर्टात आला. त्याच्या सर्व शर्टांना जयाने उदबत्तीने जाळून भोकं पाडून ठेवली होती.

शिकल्या सवरल्या लोकांत अशी त्रास देण्याची भावना पाहून दु:ख होत होतं.

प्रत्येक तारखेला प्रकाशला सबुरीचा सल्ला देऊन त्याची बोळवण केली जात होती. एकदा तर खूप ठणकावून त्याने सांगितले की, 'मला आता तडजोड करायला सांगू नका. माझं मी बघून घेईन.' तरीही कायदा हातात न घेण्याची सूचना त्याला देण्यात आली.

आणि एक दिवस जया रडत कोर्टात आली. तिच्या साड्यांच्या कपाटात प्रकाशने खाजखुजली ठेवली होती. त्यामुळे कुठलेही कपडे घातले की जयाला संबंध शरीरावर खाज येत होती. तक्रार तरी कुठे व काय करणार? व सिद्ध तरी कसं करणार? समुपदेशकसुद्धा काहीही सल्ला देऊ शकत नव्हते. व्यक्तिमत्त्वंच अशी होती की आयुष्यात त्यांचं जुळणं अशक्य होतं.

दोघांनाही संमतीने घटस्फोट घेण्याचा सल्ला देण्यात आला. दोघांच्याही वकीलाच्या सल्ल्याने त्यांनी आयुष्याची तडजोड केली. जयाने रहातं घर स्वत:ला ठेवलं अन् प्रकाश आपला हिस्सा घेऊन बाहेर पडला, एका नवीन जीवनाची सुरुवात करण्यासाठी.

ही केस बरेच वर्ष माझ्या मनात रेंगाळत राहिली. दोन शिकल्या सवरलेल्या व्यक्ती, सद्भावनेने व प्रेमापोटी लग्नगाठी बांधून एकत्र येतात. सुखी आयुष्याची किती स्वप्नं दोघानीही पाहिली असतील. पण स्वभावाला मुरड न घातल्याने व एकमेकांच्या अहंकाराला ठेच लागल्याने आयुष्य कसं उध्वस्त होतं ह्याचं उदाहरण जया व प्रकाशच्या केसमध्ये दिसत होतं व मनात लग्न वाचवण्याची प्रबळ इच्छा असूनही त्यांना एकत्र आणता येत नव्हतं.

## प्रभुतरुणास देणग्या

❀ श्रीमती कस्तुर रवींद्र तळपदे यांजकडून त्यांच्या ८० व्या वाढदिवसानिमित्त रु.११०१. वाढदिवसाच्या शुभेच्छा

❀ पद्मश्री डॉ. सदाशिव वसंतराव गोरक्षकर यांजकडून रु.१००१/-

❀ सौ. ईना भोलानाथ तळपदे यांजकडून श्री. भोलानाथ यशवंत तळपदे यांच्या ७५व्या वाढदिवसाप्रीत्यर्थ रु.१००१/- जीवेत् शतम्

❀ श्रीमती विजया रामराव झावबा यांजकडून त्यांच्या नातीचा; कु. प्रणाली किरण कोठारे यांचा श्री अभिजीत राजेंद्र नवलकर यांच्याबरोबर विवाह झाल्याप्रीत्यर्थ रु. ५०१/-

❀ सौ. ज्योत्स्ना आणि रामकृष्ण तळपदे याजकडून त्यांचा नातू ध्वनित दिनेश तळपदे पाच वर्षांचा झाल्याबद्दल रु. २५१/-शुभेच्छा.

❀ सौ. उषा आणि श्री. ज्योतींद्र दत्ताराम अजिंक्यकडून त्यांचा सुपुत्र श्री. रोहन यांच्या विवाहानिमित्त रु. ५००/-

❀ श्री. विलास भालचंद्र गोविंदराव धुरंधर यांजकडून त्यांच्या मातोश्री कै. सौ. निशा भालचंद्र धुरंधर यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त रु. २५१/-

❀ श्री. रितेश सुनील वाझकर यांजकडून त्यांच्या मुलीच्या बारशाप्रीत्यर्थ रु. १०१/-

## प्रतिक्रिया

संपादिका,

प्रभुतरुणाचा दिवाळी अंक वाचला. ह्या वर्षीच्या दिवाळी अंकाचा चेहेरामोहराच बदलला आहे. मुखपृष्ठापासून अंतरंगापर्यंत बदल जाणवतोय. ही करामत युवामंचची. त्यांचे नवीन विचार, कांदे पोहे, आयडियल डेट, किड्डी ट्रीटसारखे नवीन विषय हे सर्व स्वागतार्ह आहे. समाज परिवर्तनशील असेल तरच त्याची उन्नती होते. हे आपल्या युवापिढीला उमजले आहे. आपल्या युवा पिढीचा उत्साह भरभरून वाहत आहे. हे त्यांनी ‘प्रत्युष’सारखा कार्यक्रम करून आणि दिवाळी अंक सर्वांग सुंदर करून सिद्ध केले आहे.

कसबी नऊवारी साडी नेसलेली, डोक्याच्या मधोमध भांग काढणारी, कपाळावर चांदवा असलेली अस्सल मराठमोळी परभीण आता सलवार कमीज व जीन्स घालू लागली आहे. त्याचप्रमाणे आपला ‘प्रभुतरुण’ आता पन्नास टक्के मराठी आणि पन्नास टक्के इंग्रजीतून निघतो आहे. अशावेळी मनात शंकेची पाल चुकचुकते की समजा काळाच्या ओघात वृक्षावरील जीर्ण पर्णांप्रमाणे आपल्या समाजातील मराठीतून लिहीणारे लेखक जेव्हा वाहून जातील तेव्हा ‘प्रभुतरुण’ मडमेसारखा संपूर्ण इंग्रजीतून निघेल की काय? मग संयुक्त महाराष्ट्रासाठी आणि मराठी भाषेच्या उज्ज्वल भवितव्यासाठी ज्या १०५ हुतात्म्यांनी बलिदान केले; त्याचे काय? मराठी मायबोलीच्या अंगाखाद्यांवर खेळलेल्या आमच्यासारख्यांना हा विचारच सहन होत नाही. आपल्या समाजातील तरुण पिढीचे परकीय भाषेवर असलेले प्रभुत्व कौतुकास्पद असले तरी आपल्या मराठी भाषेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मराठी भाषेची सेवा आणि साधना ही काळाची गरज आहे. त्यामुळे माझी युवापिढीला विनंती आहे की तुमच्यातूनच मराठीतून लिहिणारे लेखक निर्माण करा आणि मराठी भाषेचा भगवा झेंडा फडकवत ठेवा. हे युवापिढीला शक्य आहे. ह्याचा अर्थ इंग्रजीतून लिहू नका असा नाही. इंग्रजीबरोबरच आपण आपल्या मायबोलीचेही काही देणे लागतो असे मानून त्या ऋणातून मुक्त व्हायचा प्रयत्न करा.

**-अरुण वसंत धराधर**

(मागची पिढी पूर्ण मराठी लिहिणारीच होती का?- हेदेखील तपासून पहायला हवे. आपण प्रतिक्रिया मराठीत दिलीत; आपल्या पत्नीने इंग्रजीतूनच लेख लिहीला होता! आज वावरत असलेली तरुण पिढीही मराठी बोलते. कार्यकारी संपादिका असलेल्या संजना आणि मिनाक्षी यांचे ‘विस्तारीत संपादकीय’ मराठीतच असते. मात्र आविष्काराची तरुण पिढीची सहज भाषा इंग्रजीच झाली आहे. त्यात बदल झाल्यास स्वागतच असेल; हे निश्चित. बघू या प्रयत्न करून. काऽऽय? **-संपादक**)

### खूषखबर

प्रभुतरूणाची वेबसाईट नव्याने सुरू झाली आहे. **रु. १०००/- ऐवजी सवलतीची किंमत रु. ५००/- केली आहे.**
आजीव सदस्य व्हा आणि
‘ऑन लाइन’ प्रभुतरुण नियमित वाचा.
पोष्टाचा होणारा विलंब टाळा.
वर्गणी कृपया
डॉ. सुरेखा बन्सी धुरंधर
नानी निवास, दिक्षीत रोड,
विलेपार्ले (पूर्व) मुंबई-५७
या पत्त्यावर पाठवावी.
वेबसाईट: www.prabhutarun.com


// श्री इंद्रायणीप्रसन्न // // श्री गुरुदेव दत्त //

**प्रकाश केटरर्स**

**शुभ मंगल, स्वागत समारंभ...... सहली, सम्मेलन!**

*आम्ही, अशा मंगल प्रसंगी रुचकर जेवणाची व्यवस्था करण्यास सज्ज आहोत. पाठारे प्रभूंच्या वैशिष्ट्यपूर्ण पदार्थांची व्यवस्था, शाकाहारी/मांसाहारी जेवणाचे चवदार गरमागरम स्वाद्य पदार्थ नियोजित वेळी पोहचविण्याची, वितरण आदी सेवा!*
*विशेषत: सागुपुरी, गोडी बटाटी, अननस सांबारे इ. आणि तसेच पंजाबी डिशेस, गुजराथी डिशेस शिवाय*
*सजावट - रोषणाई फर्निचर आदी व्यवस्था देखील करतो.*
*स्वारमधील गायत्री मंदिराशेजारील पाठारे प्रभू ज्ञाती सभागृहात एकमेव आम्हालाच मागणी असते.*

संपर्क :
**प्रवीण धुरंधर**
डि. १३, बँक ऑफ इंडिया, वृंदावन सोसायटी, दुसरी कोल डोंगरी लेन, स्वामी नित्यानंद मार्ग, अंधेरी (पू.) मुंबई-४०० ०६९.
फोन : २६८४ ०९ २६ भ्रमणध्वनी : ९९६९१०४३८८


**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र** स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४०० १०२ येथून प्रसिद्ध केले. **कार्यालय दूरध्वनी** : ६७८ ०० ४४

## प्रभुतरुणाची डायरी

### जनन

११-१२-०९ श्री. अतुल मयूर नायक, कन्या, यूएसए.

### आत्याबाई नाव बोला

कु. वैष्णवी रितेश सुनील वाझकर

### कुर्यात बटोर्मंगलम्

९-१२-०९ कुमार जीतेश उल्हास कोठारे

### नांदा सौख्यभरे

| | | |
|---|---|---|
| ९-१२-०९ | श्री. मिहीर राजीव तळपदे | कु. सोनिया रवी गुर्टू (आंतर्ज्ञातीय) |
| १२-१२-०९ | श्री. अक्षय कीर्तिकर | कु. दीपिका रमेश राव |
| १२-१२-०९ | श्री. रोहन ज्योतींद्र दत्ताराम अजिंक्य | कु. बिंदीया बालम पुष्पसेन राणे |

### मरण


| | | | |
|---|---|---|---|
| ७-१०-०९ | श्री. माधव काळूराम विजयकर | | |
| ११-११-०९ | श्री. नूतन सुरेश कोठारे | वय ६१ वर्षे | गिरगांव |
| १६-११-०९ | श्रीमती सुरेखा चित्रसेन जयकर | वय ७६ वर्षे | ठाणे |
| १९-११-०९ | डॉ. वीरसेन मुकुंदराव कोठारे | वय ८९ वर्षे | ठाकुरद्वार |
| ९-२-२०१० | सौ. भारती रामप्रसाद जयकर | वय ७५ वर्षे | अंधेरी |

## अभिनंदन

❀ डॉ. सुमन नवलकर यांच्या आत्मकथनाला कुसुमताई चौधरी पुरस्कार प्राप्त झाला. त्यांची ‘स्नेहदा’ या नियतकालिकाच्या कार्यकारी संपादिका म्हणून नियुक्ती झाली. त्यांना ‘मिळून साऱ्या जणी’तर्फे ‘रेवु’ कथा पुरस्कार लाभला. त्यांच्या ‘अजबुली घंटुली’ या बालकादंबरीला कवी अनंत फंदी हा संगमनेर येथून पुरस्कारही जाहीर झाला. अभिनंदन.

❀ कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिला आंतरशालेय पिस्तूल शूटींग स्पर्धेत मुंबई शहर विभाग आणि उपनगर, ठाणे रायगड विभाग अशा दोन स्तरीय स्पर्धात रौप्यपदक प्राप्त झाले. पुणे येथील राज्यपातळीवरील आंतरशालेय शूटींग स्पर्धेत तिची निवड झाली. अभिनंदन

❀ १९९५-२००९ या काळातील मॅरेथॉन स्पर्धा गाजल्या. सलग दहा वर्षे ‘मुंबई मॅरेथॉन, सॅन्डर्ट चार्टर्ड’मध्ये हाफ मॅरेथॉनमध्ये यशस्वी सहभाग असणाऱ्या श्री. ज्योतीन्द्र दत्ताराम अजिंक्य (माहीम) यांचे अभिनंदन.



सत्तरीत प्रवेश केलेल्या या ‘तरुणा’ ने ‘हाफ मॅरेथॉन’ म्हणजे थोडक्यात २१ किलोमीटर जलद चाल राखली. आझाद मैदान- हुतात्मा चौक- ओबेरॉय- पेडर रोड- महालक्ष्मी- वरळी ते परत आझाद मैदान असा हा दौरा असतो. युवा पिढीला हे प्रेरणास्थान ठरावे! (ज्यांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी त्यांच्याशी ९८२१३७६६६३ किंवा २४४६११७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.)

❀ सौ. रंजना सतीश धराधर यांची नाट्य-चित्रपट शिबीरकार्य आणि दादर भगिनी समाजकार्य याविषयी ‘सॅम मराठी’वर मुलाखत रंगली.

❀ श्रीमती उज्ज्वला गोविंदराव आगासकर यांची महिला दक्षता समितीत नाशिकच्या पोलीस आयुक्तांनी नियुक्ती केली. अभिनंदन.


*JOGESHWARI RESORT*

**SANITORIUM**

Under ISHWARI & VIDYADHAR CHARITABLE TRUST No. 14, Divya Hilltop Cottages, Nangargaon, LONAVALA.
Fully furnished Double Bedroom Hall & Kitchen Units Equipped with Gas, Stove, Utensils and Refrigerators available on daily charge basis.
Special concessions available on request for Womens' and Children's Institutions, Aged, Disabled or for other justifiable reasons and medical certificates. Booking made on phone as below. Also available, at the Mumbai address, Wheel Chair, Walkers, Crutches, against refundable deposits only.

Trustees: PRAMILA & MADHUKAR TALPADE
102, ``PRIYA" Raviraj Oberoi Complex, SAB T. V. Lane,
New Link Road, Andheri(W), Mumbai-400053.
Tel.: 2630 3902 / 2630 3906 Mobile : 9821447675
Booking Mobile : 09823884094 / 09422543614